**अर्जदार चा उलटतपास गैरअर्जदारातर्फे विधीज्ञ श्री. जे. के. देशपांडे यांच्यामार्फत शपथेवर सुरु**

आरोपींनी मला हुंड्यासाठी मानसीक व शारीरीक त्रास कोणत्या तारखेस दिला ते मला निश्चीतपने सांगता येत नाही. फलॅटसाठी पैशाची मागणी कोणत्या तारखेस केली ते मला निश्चीतपने सांगता येत नाही. मला देत असलेल्या त्रासाबद्दल मी गैरअर्जदार यांच्या विरुध्द कोणत्याही पोलिस स्टेशन मध्ये तक्रार केली नव्हती. दिनांक ३१.१२.२०१५ रोजी मी मुंबई येथे होते. दिनांक ३१.१२.२०१५ रोजी माझ्यात आणि गैरअर्जदार मध्ये कोणताही वाद झाला नव्हता. दिनांक ३१.१२.२०१५ रोजी मी गैरअर्जदार यांची २४ तास वाट पाहीली. त्यानंतर मी कामोठी पोलिस स्टेशन, नवी मुंबई येथे गैरअर्जदार बेपत्ता असल्याची तक्रार दिली. त्यावेळी माझ्या सोबत माझा मुलगा होता. अर्ज देण्यासाठी गेले तेंव्हा माझे वडील माझ्यासोबत नव्हते. मी कामोठी पोलिस स्टेशन मध्ये चौकशी करीता बऱ्याच वेळा गेले होते. पोलिसांनी माझ्याकडे काय चौकशी केली हे मला सांगता येत नाही. मी पोलिसांच्याकडे गैरअर्जदार ड्यूटीला जातो असे सांगुन गेले ते परत आले नाहीत असे कारण सांगीतले होते. मी २०१६ मध्ये औराद शहाजानी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दिली होती. तसेच दिनांक १८.०६.२०१६ रोजी कामोठी पोलिस स्टेशन मध्ये तक्रार दिली होती. दिनांक ०७.०७.२०१६ रोजी गैरअर्जदार मुरुड येथे राहत असल्याचे समजल्यामूळे मी मुरूड येथील सासरचे लोक राहत असलेल्या घरामध्ये गेले होते. महिला तक्रार निवारण मंचाकडे गैरअर्जदारने नांदवायचे नाही असा दिलेला जबाब मी दाखल करु शकते. मी गैरअर्जदारचे घर केंव्हा सोडले ते मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी गैरअर्जदारचे घर सोडल्यापासून लातूर येथे राहते. मी हलगरा येथे मुलांच्या शिक्षणासाठी प्रवेश घेतला नव्हता. मी अंगणवाडी, बालवाडी हलगरा

येथे माझ्या मुलाचा प्रवेश केलेला नव्हता. मी हलगरा येथे राहत होते याचा कागदोपत्री पुरावा दाखल करु शकत नाही. माझे शिक्षण बारावी पर्यंत झाले आहे. मी सध्या लातूर येथे राहते. ते घर भाड्याचे आहे. राजेश लांडगे हे त्या घराचे मालक आहेत. मी भाड्याच्या घरात राहत असलेला कालावधी मला सांगता येत नाही. मी घर भाड्याने घेतले होते हे दाखवण्याकरीता माझ्याकडे भाडेपट्टा नाही. मी लातूर येथील विजबील, पाणीपट्टी भरल्याच्या पावत्या माझ्याकडे नाहीत. गैरअर्जदार आणि माझ्यामध्ये शेवटचे बोलणे केंव्हा झाले होते हे मला आठवत नाही. सन २०१६ मध्ये आमचे शेवटचे बोलने झाले होते. त्यानंतर आमचा एकमेकांशी संपर्क झालेला नाही. गैरअर्जदारने मुंबई येथे एक फ्लॅट घेतलेला होता. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार बेरोजगार आणि कर्जबाजारी झाल्याने त्याने तो फ्लॅट विकला होता. गैरअर्जदारने सिटीमॅक्स कंपनी केंव्हा सोडली याची मला माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, गैरअर्जदार सध्या बेकार आहे. गैरअर्जदार सध्या नोकरी करतो. आत्ता तो कोणत्या कंपनीत नोकरी करतो ते मला माहित नाही.

माझ्या वडीलांना वडीलोपार्जीत शेती नाही. माझ्या वडील आणि चुलत्यामध्ये दिवाणी वाद प्रलंबीत आहेत. तो वाद वडीलोपार्जीत घराबाबत आहे. लातूरमध्ये माझ्या वडीलांचे घर ४ खोल्यांचे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या वडीलांच्या लातूर येथील घरामध्ये आम्ही सर्व भावंडे एकत्रीत राहतो.

गातेगाव येथील गैरअर्जदारचे मिळकतीचे वर्णन सर्वे नंबर १६१ असून क्षेत्र १ हेक्टर २२ आर आहे. या मिळकतीच्या चतुःसीमा मला सांगता येतात. त्या जमीनीमध्ये एकत्र कुटूंबातील चार जन हिस्सेदार आहेत. ती जमीन वडीलोपार्जीत आहे. गैरअर्जदाराचा फ्लॅट बदलापूर येथे आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या फ्लॅटचे हप्ते थकीत झाल्याने बँकेने त्या फ्लॅटचा लिलाव करुन फ्लॅट विक्री

केला आहे. फ्ॅलट आजही गैरअर्जदाराच्या नावे असल्याचा कागदोपत्री पुरावा माझ्याकडे नाही. मी गैरअर्जदाराने मला नांदावयास घेवून जावे यासाठी न्यायालयात दावा दाखल केला होता. त्याचा क्रमांक मला सांगता येत नाही. त्या दावेची नक्कल मी दाखल करु शकते. गैरअर्जदार आणि माझ्यातले वाद मिटवून मी पुन्हा नांदावयास गेले असे झाले नाही. मी गैरअर्जदारचे घर सोडून जाताना मला न्यायला कोणीही आले नव्हते.

**मध्यान वेळ झाल्याने उलटतपास तहकूब करण्यात आले.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृती,**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2025.08.29 12:16:21 +0530

**(श्रीमती.ए.एस.गुंजवटे)**

**दिनांक २६/०८/२०२५.** **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, निलंगा**

**ठिकाण निलंगा.** **जिल्हा लातूर.**